॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

■ अहिल्यानगर ■ बुधवार, दि. २९ जुलै २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ५२ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

✻ सुविचार ✻

जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदलवा.

SPOT NEWS

## आंदोलनातील तरुणींवर खा. कंगनाची गलिच्छ टीका

● **नवी दिल्ली** – भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना राणावतने मंगळवारी कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात सहभागी झालेल्या हिंदू तरुणींवर अत्यंत टोकाची आणि वादग्रस्त टीका केली आहे. जनरेशन गटर अशी उपाधी देत, त्यांच्या जीवनशैली, वर्तन आणि आंदोलनाच्या पद्धतीवर कठोर शब्दांत निशाणा साधला. तिच्या या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे. कंगना रानावतने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे एक भलीमोठी पोस्ट शेअर करत आंदोलनात सहभागी झालेल्या हिंदू तरुणींवर टीका केली. काही जणी स्वत:ला आधुनिक आणि स्वतंत्र दाखवण्याचा प्रयत्न करतात; मात्र त्या स्वातंत्र्याची जबाबदारी स्वीकारत नाहीत, असा दावा केला. जर तुम्ही जबाबदारीची जाणीव न ठेवता मुक्त जीवन जगण्याचा प्रयत्न केला, तर तुम्ही केवळ एक बिघडलेली व्यक्ती आहात. त्या मुली अमली पदार्थ घेणे, मद्यपान करणे किंवा अनेक जोडीदारांशी लैंगिक संबंध ठेवणे या स्वातंत्र्यांचे अभिमानाने प्रदर्शन करतात; हे सर्व करताना त्या निर्लज्जपणे आपल्या पालकांच्या कमाईवर जगतात. प्रत्यक्षात स्वतंत्र नसतानाही मुक्त जीवन जगण्याच्या अधिकारासाठी सतत लढत असतात. मी तुम्हाला एक साधी गोष्ट आठवण करून देते: मुक्त जीवन हे कमवावे लागते. जबाबदारी न स्वीकारता स्वातंत्र्याचा आव आणणारे लोक गटर छाप आहेत असेही तिने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

## राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र येणार नाहीत : शरद पवार

● **बारामती** – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दोन्ही गटांच्या पुन्हा एकत्र येण्याच्या शक्यतेबद्दल मंगळवारी शरद पवार यांना विचारण्यात आले. यावर त्यांनी दोन्ही गट एकत्र येण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे सांगितले. एक दिवसापूर्वी, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)चेसुप्रिया सुळे आणि बजरंग सोनवणे सोमवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना रिसेप्शनचे आमंत्रण देण्यासाठी पोहोचले होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री म्हणाले, आता काहीही सांगता येत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) प्रमुख शरद पवार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीवर मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, शरद पवार आणि पंतप्रधान मोदी यांच्या भेटीत काय चर्चा झाली, हे कोणालाच माहीत नाही. सध्या फक्त अफवा आणि तर्कवितर्क आहेत. यावर सध्या काहीही बोलता येणार नाही. गेल्या पाच दिवसांत भाजपच्या नेत्यांसोबत ही सुप्रिया सुळे यांची दुसरी महत्त्वाची भेट होती.

# मराठा आरक्षण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करा

### ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सुचना । मराठा आरक्षण उपसमितीची बैठक संपन्न



● **अहिल्यानगर । वीरभूमी–** मराठा आरक्षण कक्षाचे कामकाज अधिक गतिमान आणि प्रभावी करण्यासाठी पुढील सात दिवसांमध्ये आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे भरून हा कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जलसंपदा तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीबाबत तसेच इतर संलग्न बाबींवरील शिफारशींच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी मा. ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रिमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीस उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासह विषयाशी संबंधित सचिव तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत मराठा समाजाशी संबंधित प्रलंबित विषय आणि शैक्षणिक सवलती व सोयी–सुविधांबाबतचा आढावा घेवून अंमलबजावणी बाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना इतर मागासवर्गीय (ओबीसी) विद्यार्थ्यां प्रमाणे सर्व शैक्षणिक सवलती व सोयी–सुविधा देण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ५ जून २०२६ च्या शासन निर्णयाची सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी विनाविलंब व तात्काळ अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश मंत्री विखे पाटील यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रलंबित असलेल्या जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्रांच्या सर्व प्रकरणांचा निपटारा तातडीने व प्राधान्यक्रमाने करावा.

तालुकास्तरीय वंशावळ समितीस मुदतवाढ देण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करण्याचे आदेश सामाजिक न्याय विभागाला बैठकीत देण्यात आले आहेत.

अधिसंख्य पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या नियमित सेवा विषयक लाभांबाबत प्रलंबित असलेली कार्यवाही तातडीने पूर्ण करावी. अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातून निवड झालेल्या परंतु मराठा आरक्षण लागू झाल्यामुळे नियुक्ती न दिलेल्या उमेदवारांच्या प्रश्नाबाबत सामान्य प्रशासन विभाग, ऊर्जा विभाग व सर्व संबंधित विभागांनी सर्व कायदेशीर बाबी तपासून पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी करण्याच्या सूचनाही बैठकीत देण्यात आल्या.

पोलीस उपनिरीक्षक परीक्षा २०१७ मधील बाधित महिला उमेदवारांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी अप्पर मुख्य सचिव (सेवा), अप्पर मुख्य सचिव (गृह) आणि सचिव (सामाजिक विकास समन्वय) यांनी एकत्रित बैठक घेऊन संबंधित महिला उमेदवारांना आपली बाजू मांडण्यासाठी संधी द्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

## ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांना १२ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागणार

● **मुंबई । वीरभूमी–** ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या राखीव जागांवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत स्पष्ट तरतूद करण्यासाठी 'महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २०२६' प्रख्यापित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. आता या सदस्यांना १२ महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागणार आहे.

या निर्णयानुसार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर, मात्र या अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी झालेल्या ग्रामपंचायत, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक अथवा पोटनिवडणुकांमध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना, निवडून आल्याचे घोषित झाल्यापासून १२ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात येणार आहे.

निर्धारित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर झाल्यास संबंधित व्यक्तीची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाल्याचे मानण्यात येईल. तसेच ती व्यक्ती अनुक्रमे सदस्य, सरपंच, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष अथवा पंचायत समिती सभापती म्हणून पदावर राहण्यास अपात्र ठरेल. यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील संबंधित कलमांमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येणार आहेत.

### एनडीपीएस खालील प्रकरणासाठी पुण्यात विशेष न्यायालय स्थापन

मादक द्रव्ये व मादक पदार्थ अधिनियम १९८५ अंतर्गत दाखल प्रकरणे चालविण्याकरिता पुणे येथे विशेष न्यायालय स्थापन करण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

उच्च न्यायालयाने पुणे येथील प्रलंबित प्रकरणांची संख्या विचारात घेता विशेष न्यायालय स्थापन करण्याची शिफारस केली आहे. त्यानुसार आज झालेल्या बैठकीत विशेष न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यास आवश्यक आठ पदांना मान्यता देण्यात आली. यामध्ये जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, लघुलेखक श्रेणी–एक, सहाय्यक अधीक्षक, वरिष्ठ लिपीक अशी प्रत्येकी एक आणि कनिष्ठ लिपीक दोन अशा एकूण सहा नियमित पदे आणि दोन शिपाई पदांची भरती बाह्ययंत्रणेव्दारे करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी येणाऱ्या एक कोटी २६ लाख ३५ हजार रुपयांच्या खर्चासही मंजुरी देण्यात आली.

राज्यात सध्या एनडीपीएस कायद्यानुसार सुमारे तीस हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यापैकी पुण्यात १४२५ प्रकरणे प्रलंबित आहेत. पुणे येथील न्यायालयासाठी पुणे जिल्हा न्यायालयातील कक्ष क्रमांक २२ उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

## कर्जत येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयास मान्यता

● **मुंबई । वीरभूमी–** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत व जामखेड तालुक्यांतील नागरिकांना न्यायसेवा अधिक सुलभ व जलद उपलब्ध करून देण्यासाठी कर्जत येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

या प्रस्तावित न्यायालयासाठी न्यायिक अधिकाऱ्याचे एक पद, शासकीय अभियोक्ता कार्यालयासह सहाय्यभूत कर्मचाऱ्यांची २२ पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच आवश्यक कामकाजासाठी बाह्य यंत्रणेद्वारे सात मनुष्यबळांची सेवा घेण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

प्रस्तावित न्यायालय व शासकीय अभियोक्ता कार्यालयासाठी तीन कोटी तीस लाख रूपये खर्चास मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे कर्जत व जामखेड तालुक्यांतील नागरिकांना जिल्हा व सत्र न्यायालयीन कामकाजासाठी दूरवर जावे लागणार नाही. स्थानिक पातळीवर न्यायदानाची सुविधा उपलब्ध झाल्याने न्यायप्रविष्टांचा वेळ, खर्च आणि श्रम वाचतील. तसेच न्यायव्यवस्थेची कार्यक्षमता वाढून नागरिकांना अधिक वेगवान, सुलभ आणि प्रभावी न्यायसेवा मिळण्यास मदत होणार आहे.

### कुर्डूवाडी येथे दिवाणी न्यायालयास मान्यता

सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील कुडूवाडी येथे दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

या न्यायालयासाठी न्यायिक अधिकाऱ्याचे एक पद, सहाय्यक कर्मचाऱ्यांची ११ नियमित पदे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच आवश्यक कामकाजासाठी बाह्य यंत्रणेद्वारे सेवा घेण्यासही मान्यता देण्यात आली.

प्रस्तावित न्यायालयासाठी एक कोटी अठरा लाख चौऱ्याहत्तर हजार रूपयांच्या खर्चासही मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे कुडूवाडी व परिसरातील नागरिकांना दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या प्रकरणांसाठी दूरवर जावे लागणार नाही. न्यायप्रविष्टांना स्थानिक पातळीवर जलद, सुलभ व परिणामकारक न्यायसेवा उपलब्ध होण्यास मदत होणार असून न्यायव्यवस्थेची कार्यक्षमताही अधिक बळकट होणार आहे.

### अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या

# चेअरमनपदी बाबासाहेब बोडखे, व्हा. चेअरमनपदी आप्पासाहेब जगताप

### स्वाभिमानी परिवर्तन मंडळाचा एक वर्षाचा फॉर्म्युला । सर्वांना संधी देण्याची भूमिका, अभ्यासिका व ठेवी वाढ अभियानाची घोषणा

● **अहिल्यानगर । वीरभूमी–** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीत स्वाभिमानी परिवर्तन मंडळाच्या एक वर्षाच्या कालावधीनंतर चेअरमनपदी बाबासाहेब बोडखे व व्हाईस चेअरमनपदी आप्पासाहेब जगताप यांची मंगळवारी (दि. २८ जुलै) बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच तज्ञ संचालकपदी कल्याण ठोंबरे (नगर तालुका) व बाजीराव जाधव (कर्जत) यांची नियुक्ती करण्यात आली.

मावळते चेअरमन आप्पासाहेब शिंदे व व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके यांनी एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करून दिलेल्या राजीनाम्यानंतर ही निवड प्रक्रिया राबविण्यात आली. चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीसाठी संचालक मंडळाची बैठक जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षक के. के. आव्हाड यांच्या प्रमुख उपस्थितीत सोसायटीच्या सभागृहात पार पडली.

चेअरमनपदासाठी बाबासाहेब बोडखे तर व्हाईस चेअरमनपदासाठी आप्पासाहेब जगताप यांचा प्रत्येकी एकमेव अर्ज प्राप्त झाला. चेअरमनपदासाठी महेंद्र हिंगे हे सुचक तर सुधीर कानवडे अनुमोदक होते. व्हाईस चेअरमनपदासाठी अर्जुन वाळके हे सुचक तर शिवाजी लवांडे अनुमोदक होते. सर्व संचालकांच्या बहुमताने के. के. आव्हाड यांनी बाबासाहेब बोडखे यांची चेअरमनपदी व आप्पासाहेब जगताप यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा करून त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी माध्यमिक शिक्षक सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे, माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे, माजी व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, संचालक महेंद्र हिंगे, सुनील दानवे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, विजय पठारे, अतुल कोताडे, बाजीराव अनभुले, शिवाजी लवांडे, छबू फुंदे, साहेबराव रक्टे, ईश्वर धुमाळ, संभाजी गाडे, बाळाजी गायकवाड, सुधीर कानवडे, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ आदी उपस्थित होते.

निवडीनंतर मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रा. सुनील पंडित यांच्या अध्यक्षतेखाली सभा पार पडली. यावेळी माजी चेअरमन आप्पासाहेब शिंदे म्हणाले की, सोसायटीमध्ये प्रत्येकाला संधी दिली जाणार आहे. सेवानिवृत्ती जवळ आलेल्या सभासदांचाही विचार करून त्यांना जबाबदारी देण्यात येईल. सर्वांना एकाच वेळी संधी देता येणार नसली तरी भविष्यात प्रत्येकाचा विचार केला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, सोसायटीच्या तिसऱ्या मजल्यावर एमपीएससी व यूपीएससी अभ्यासिका सुरू होत असून तिचे लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच संस्थेच्या तालुका पातळीवरील कार्यालयांमध्येही अभ्यासिका सुरू करण्याचा मानस आहे. संस्थेत सध्या ७.५ टक्के व्याजदर असून ५० कोटी रुपयांच्या ठेवी वाढल्यास व्याजदर वाढविण्याची गरज भासणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी माजी चेअरमन सुरेश मिसाळ, विलास साठे, संजय निक्रड, ज्ञानदेव बेरड, रमजान हवालदार, उद्धव गायकवाड, आबासाहेब जगताप, शहर बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते, मारुती लांडगे, प्राथमिक बँकेचे माजी चेअरमन आबासाहेब जगताप तसेच माजी सभापती माधवराव काटे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यांनी पंचवीस वर्षांच्या संघर्षानंतर मिळालेली सत्ता, एका वर्षात केलेली उल्लेखनीय कामगिरी, सर्वांना संधी देण्याची भूमिका तसेच संस्था स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेतला.

सुभाष कडलग म्हणाले की, माध्यमिक शिक्षक सोसायटीत अनेक विद्यार्थी चेअरमन होत असल्याचे पाहून आनंद होत आहे. परिवर्तन मंडळात कोणतेही मतभेद नसून सर्व संचालक एकदिलाने काम करत आहेत. बिनविरोध निवड झालेले चेअरमन व व्हाईस चेअरमन हे चळवळीतील कार्यकर्ते असून त्यांच्या माध्यमातून संस्थेचे काम अधिक प्रभावीपणे होईल. मुलींच्या होस्टेलची पायाभरणीही या कार्यकाळात व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. व्हाईस चेअरमन आप्पासाहेब जगताप यांनी सर्व संचालकांनी दाखविलेल्या विश्वासाबद्दल सर्वांचे आभार मानले.




नवनिर्वाचित चेअरमन बाबासाहेब बोडखे म्हणाले की, सर्व संचालक मंडळ संस्थेच्या हितासाठी एकदिलाने काम करत आहे. सध्या सुरू असलेले कार्य हे संस्थेच्या पुढील २५ वर्षांच्या विकासाची पायाभरणी ठरणार आहे. जिल्हा बँकेची १५८ कोटी रुपयांवर गेलेली सीसी नियमबाह्य कामकाज थांबवून आणि काटकसर करून ७२ कोटी रुपयांवर आणल्याचा दावा त्यांनी केला.

संस्थेच्या ठेवी वाढविण्यासाठी विशेष अभियान सुरू करण्यात येणार असून सर्व संचालक स्वतः ठेवी ठेवून या अभियानाची सुरुवात करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सर्व संचालक संस्थेचे हित डोळ्यासमोर ठेवून काम करत असून पद, सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठेपेक्षा स्वाभिमानाने काम करणारे हे संचालक असल्याचे त्यांनी नमूद केले. दत्ता पाटील नारळे म्हणाले की, संचालकांनी एका वर्षात आदर्श कामगिरी करून सभासदांची मने जिंकली आहेत. सत्ता टिकवण्यासाठी नव्हे, तर सभासदांचे हित जपण्यासाठी हे संचालक मंडळ कार्यरत असून काटकसरीने काम करून सभासदांचे हित जोपासले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रा. सुनील पंडित म्हणाले की, मामासाहेब हातवळणे यांनी १९४७ साली या संस्थेची उभारणी केली. २५ वर्षांच्या सत्तांतरानंतर स्वाभिमानी परिवर्तन मंडळाने एका वर्षात उत्कृष्ट काम करून दिलेली वचने पूर्ण करण्यास सुरुवात केली आहे. मुलींच्या वस्तीगृहासाठी महापालिकेकडून ओपन स्पेस उपलब्ध करून घ्यावी, तसेच तालुकास्तरावर अभ्यासिका सुरू झाल्यामुळे सभासदांच्या मुलांना मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध होईल. संस्थेने धोरणात्मक पद्धतीने सुरू केलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले.

या सभेसाठी बाळासाहेब राजळे, नंदकुमार शितोळे, शिरीष टेकाडे, ज्ञानेश्वर काळे, बाळासाहेब सोनवणे, दीपक बुधवंत, नवनाथ घुले, राजू सोनवणे, सुभाष गव्हाणे तसेच माजी चेअरमन सत्यवान थोरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र हिंगे यांनी केले, तर आभार उमेश गुंजाळ यांनी मानले.

SPOT NEWS

## रूपाली ढमढेरे यांना पीएचडी पदवी प्रदान

**● पारनेर । वीरभूमी –**
शिक्षण प्रसारक मंडळ संचलित स्वातंत्र्यसैनिक रायकुमार बी. गुजर प्रशाला, तळेगाव ढमढेरे येथील उपशिक्षिका रूपाली अनिल ढमढेरे (देशमुख) यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी प्रदान केली आहे. रूपाली ढमढेरे या पारनेर तालुक्यातील रांजणगाव मशीद येथील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व प्रगतिशील शेतकरी किसनराव देशमुख यांच्या कन्या असून उद्योजक योगेश देशमुख व अभिजित देशमुख यांच्या भगिनी आहेत. त्यांनी 'दीनमित्रमधील अग्रलेखांचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास (इ.स. १९१० ते १९३०)' या विषयावर संशोधन पूर्ण केले. हे संशोधन प्रेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर येथील संशोधन केंद्रामार्फत पूर्ण करण्यात आले. या संशोधनासाठी ज्येष्ठ संशोधक व मार्गदर्शक प्रा. डॉ. वसंत रघुनाथ शेंडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच संशोधन कार्यादरम्यान पती अनिल ढमढेरे, प्रा. डॉ. संदीप सांगळे, दिनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे नातू उत्तमराव पाटील तसेच शिक्षण प्रसारक मंडळ यांचे विशेष सहकार्य लाभले. रूपाली ढमढेरे यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल शिक्षण, सामाजिक व साहित्य क्षेत्रातील मान्यवर, सहकारी शिक्षक, मित्रपरिवार तसेच नातेवाईकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांच्या या यशामुळे तळेगाव ढमढेरे परिसराच्या शैक्षणिक लौकिकात आणखी भर पडली आहे.

## महिला उद्योजिकांसाठी शहरात स्वातंत्र्य दिनानिमित्त 'आनंद नगरी खरेदी महोत्सव'

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
स्थानिक महिला उद्योजिकांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, महिला गृहउद्योगांना चालना मिळवून देणे तसेच 'व्होकल फॉर लोकल' या संकल्पनेला बळकटी देण्याच्या उद्देशाने राधेय महिला गृह उद्योग यांच्या वतीने स्वातंत्र्य दिनानिमित्त 'आनंद नगरी खरेदी महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवामध्ये महिला बचत गट, गृहउद्योग चालविणाऱ्या महिला तसेच स्थानिक महिला व्यावसायिकांना आपले विविध प्रकारचे स्टॉल उभारण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. हा दोन दिवसीय खरेदी महोत्सव शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट आणि शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते रात्री १० या वेळेत जैन स्थानक, शिवगंगा टॉवरजवळ, मार्केटयार्ड, सारसनगर, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आला आहे. या प्रदर्शनामध्ये शहरातील नागरिकांसाठी विविध प्रकारची उत्पादने आणि खाद्यपदार्थ एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याने मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे. या महोत्सवात कपडे, ज्वेलरी, हस्तकला वस्तू, ब्युटी प्रॉडक्ट्स, गेम स्टॉल्स तसेच विविध स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल आकर्षणाचे केंद्र ठरणार आहेत. घरगुती व्यवसाय करणाऱ्या महिलांना आपल्या उत्पादनांचे थेट ग्राहकांपर्यंत घेऊन जाण्याची आणि नवीन ग्राहकांशी संपर्क वाढविण्याची संधी या प्रदर्शनातून मिळणार आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती तसेच लघुउद्योजकांसाठीच्या योजनांना पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब पाटील यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती योजनेसाठी सुमारे २०० कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ ६० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला. तसेच अतिरिक्त ९० कोटींच्या पुरवणी निधीची मागणीही नाकारण्यात आल्याने मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, पारशी व जैन समाजातील उच्च व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शुल्क प्रतिपूर्तीची रक्कम वेळेवर मिळत नसून त्यांना आर्थिक व मानसिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. निवेदनात केंद्र शासनाने बंद केलेले मौलाना आझाद एज्युकेशन फाऊंडेशन पुन्हा सुरू करण्यासाठी राज्य शासनाने केंद्राकडे पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन लघुउद्योजकांच्या प्रलंबित कर्ज अर्जांचा तातडीने निपटारा करावा, अशीही मागणी करण्यात आली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष अथर खान यांनी अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी व लघुउद्योजकांना न्याय मिळण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली. तसेच शिष्यवृत्ती, शुल्क प्रतिपूर्ती आणि स्वयंरोजगार योजनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी जिल्हाध्यक्ष अथर खान, जिल्हा कार्याध्यक्ष समीर पठाण, शहर कार्याध्यक्ष अजहर शेख, समन्वयक परवेज शेख, फारूक रंगरेज, रियाज कुरेशी, चंद्रकांत उजागरे, बब्बू कुरेशी, बशीर शेख, फैयाज तांबोळी उपस्थित होते.

# पारनेरच्या पिंपळेश्वर मंदिरातील इ.स. १७७९ चा शिलालेख

## मराठाकालीन धार्मिक व स्थापत्य इतिहासाचा महत्त्वपूर्ण पुरावा

■ **विजय उंडे**

**● अहिल्यानगर । वीरभूमी –**
जिल्ह्यातील पारनेर येथील ओढ्याकाठी असलेल्या प्राचीन श्री पिंपळेश्वर महादेव मंदिरात अठराव्या शतकातील एक महत्त्वपूर्ण शिलालेख आढळून येतो. मंदिराच्या मुख्य सभामंडपाच्या डाव्या बाजूच्या आतील भिंतीवर उठाव स्वरूपात कोरलेला हा नऊ ओळींचा देवनागरी लिपीतील मराठी-संस्कृत मिश्र भाषेतील शिलालेख मराठाकालीन धार्मिक, सामाजिक आणि स्थापत्य इतिहासाचा विश्वासार्ह प्राथमिक पुरावा मानला जातो.

शिलालेखावर कालांतराने वातावरणाचा परिणाम, रंगरंगोटी व सिमेंटचे थर चढल्याने मूळ मजकूर स्पष्ट दिसत नाही. मात्र, शिलालेखाचा छाप घेतल्यानंतर त्यावरील अक्षरे ठळकपणे उठून दिसतात आणि संपूर्ण मजकूर वाचनीय होतो. मंदिर चारही बाजूंनी तटबंदीयुक्त असून परिसरातील विशाल पिंपळाच्या वृक्षामुळे या मंदिराला पिंपळेश्वर महादेव मंदिर हे नाव प्राप्त झाले आहे.

शिलालेख वाचन

१ ।। श्री गजानन ।।२ ।। श्री सांब चरणी तत्पर लक्ष्मण महा ।।३ ।। देव करंदीकर निरंतर कपि गोत्र नृप शाली ।।४ ।। वाहन शके १७०१ विकारी नाम संवत्सरे वै।।५ ।। शाख शुद्ध त्रयोदशी सौम्यवासरे प्रासा ।।६ ।। दा दिले क्षेत्र पाराशरी श्री मनिकर्णिके ।।७ ।। नद्या दक्षिणा तीरा शिवेश्वर बाणलिं ।।।८ ।। ग स्थापिले पार्वती गणेश नंदि सह ।।९ ।। वर्तमान .. शुभ भवंतु । ।।

या शिलालेखाची सुरुवात मंगलसूचक श्री गजानन या शब्दांनी करण्यात आली आहे. त्यामध्ये श्री सांब (भगवान शिव) यांच्या चरणी तत्पर असलेले लक्ष्मण महादेव करंदीकर यांनी शालिवाहन शक १७०१, विकारी नाम संवत्सर, वैशाख शुद्ध त्रयोदशी अर्थात २८ एप्रिल १७७९ (सोमवार) या शुभदिनी पाराशरी क्षेत्र (सध्याचे पारनेर) येथे माणिकर्णिका नदीच्या दक्षिण तीरावर शिवमंदिर उभारून त्यामध्ये शिवेश्वर बाणलिंग, पार्वती, गणेश आणि नंदी यांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना केल्याची नोंद आहे. लेखाच्या शेवटी शुभ भवंतु या शब्दांद्वारे सर्वांच्या कल्याणाची मंगलकामना व्यक्त करण्यात आली आहे.


इतिहासाच्या दृष्टीने हा शिलालेख अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. मंदिरनिर्मितीची परंपरा, देवप्रतिष्ठेचे धार्मिक विधी, स्थानिक दानशूर व्यक्तींचे योगदान आणि त्या काळातील धार्मिक जीवन यांचे चित्र या शिलालेखातून स्पष्ट होते. शालिवाहन शक १७०१, विकारी नाम संवत्सर आणि वैशाख शुद्ध त्रयोदशी असा स्पष्ट कालोल्लेख असल्यामुळे मंदिराच्या स्थापनेचा निश्चित काल निश्चित करण्यास



हा लेख उपयुक्त ठरतो.

शिलालेखात पाराशरी क्षेत्र, माणिकर्णिका नदी तसेच लक्ष्मण महादेव करंदीकर यांसारख्या स्थाननामे व व्यक्तिनामांचा उल्लेख आढळतो. त्यामुळे त्या काळातील स्थानिक इतिहास, समाजरचना, धार्मिक केंद्रे आणि दानपरंपरेचा अभ्यास करण्यासाठी हा लेख महत्त्वपूर्ण ठरतो. तसेच प्रासाद, शिवेश्वर बाणलिंग, पार्वती, गणेश आणि नंदी यांच्या उल्लेखातून तत्कालीन शैव उपासना, मंदिर स्थापत्य आणि देवपरिवार प्रतिष्ठापनेची परंपरा स्पष्ट होते.

शेवटी शुभ भवंतु या शब्दांमधून तत्कालीन धार्मिक लेखनशैली, लोककल्याणाची भावना आणि पुण्यकर्माविषयीची श्रद्धा अधोरेखित होते. त्यामुळे पिंपळेश्वर मंदिरातील हा शिलालेख



मराठाकालीन धार्मिक जीवन, मंदिर स्थापत्य, दानपरंपरा, कालगणना आणि स्थानिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत मौल्यवान ऐतिहासिक स्रोत म्हणून ओळखला जातो.

या शिलालेखाचे संशोधन, माहिती संकलन व वाचन पुणे येथील अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे.

## छाया निऱ्हाळी यांना 'गुणवंत शिक्षक' पुरस्कार

### जिल्हा गणित अध्यापक मंडळाचा सन्मान । उल्लेखनीय योगदानाची दखल

**● पाथर्डी । वीरभूमी –**
जिल्हा गणित अध्यापक मंडळ, अहिल्यानगर यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'गुणवंत शिक्षक पुरस्कार' पाथर्डी येथील एम. एम. निऱ्हाळी विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका सौ. छाया निऱ्हाळी यांना प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर येथील अशोकभाऊ फिरोदिया हायस्कूलमध्ये आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला.



■ छाया । अनिल खाटेर

गणित विषयाचे प्रभावी, विद्यार्थीकेंद्री आणि सुलभ अध्यापन करत विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण करण्याचे मोलाचे कार्य छाया निऱ्हाळी यांनी अनेक वर्षांपासून केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक गुणवंत विद्यार्थी घडले असून शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत जिल्हा गणित अध्यापक मंडळाने त्यांना या पुरस्काराने सन्मानित केले.

या प्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, माध्यमिक शिक्षण विभागाचे शिक्षण निरीक्षक श्रीराम थोरात, महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष संजय निकरड तसेच जिल्हा गणित अध्यापक मंडळाचे अध्यक्ष नवनाथ घुले यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या यशाबद्दल विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी तसेच विविध स्तरांतील मान्यवरांनी छाया निऱ्हाळी यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

छाया निऱ्हाळी यांना मिळालेल्या या सन्मानामुळे पाथर्डीच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, त्यांच्या कार्याचा गौरव संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरत आहे.

## शेतकऱ्यांनी ३१ जुलैपर्यंत पीक विम्यासाठी अर्ज करावेत; तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांचे आवाहन

**● कोपरगाव । वीरभूमी–**
राज्यात सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना लागू करण्यात आली असून खरीप हंगामातील बाजरी, तूर, मका ,सोयाबीन, कापूस , भुईमुग व खरीप कांदा या सात पिकांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांनी ३१ जुलै २०२६ पूर्वी विमा योजनेत सहभागी होऊन लाभ घ्यावा, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या ३ जुलै २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारित योजना लागू करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी या वर्षी ईफको टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत पिक विमा उतरविला जाणार आहे. अधिसूचित महसूल मंडळात अधिसूचित पिकाचे चालू वर्षातील सरासरी उत्पादन उंबरठा उत्पादनापेक्षा कमी झाल्यास संबंधित शेतकऱ्यांना विमा नुकसानभरपाई मिळणार आहे.

कृषी विभागाने जाहीर केलेल्या माहितीनुसार अन्नधान्य व कडधान्य पिकांसाठी विमा संरक्षित रकमेच्या २ टक्के, तर व्यापारी पीक असलेल्या कापूस व खरीप कांद्यासाठी ५ टक्के विमा हप्ता भरावा लागणार आहे.

कोपरगाव तालुक्यातील विविध पिकांसाठी विमा संरक्षित रक्कमही निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार कापसासाठी प्रतिहेक्टर ६५००० रुपये, खरीप कांद्यासाठी ७५ हजार रुपये, सोयाबीनसाठी ६२ हजार ५०० रुपये, तुरीसाठी ४७ हजार रुपये, बाजरीसाठी ३२ हजार रुपये, मका पिकासाठी ४० हजार रुपये, भुईमुग पिकासाठी ४५ हजार रुपये विमा संरक्षित रक्कम निश्चित करण्यात आली आहे. या रकमेवर संबंधित पिकानुसार शेतकऱ्यांना विमा हप्ता भरावा लागणार आहे. विमा हप्ता रुपये प्रती हेक्टर कापसासाठी १९५०, खरीप कांद्यासाठी १५००, सोयाबीनसाठी १२५०, तुरीसाठी ९४०, बाजरीसाठी ६४०, मका पिकासाठी ८००, भुईमुग पिकासाठी ९०० एवढा असणार आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक असणे बंधनकारक आहे. तसेच जमिनीची कागदपत्रे, पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक आणि आधारशी संलग्न बँक खाते आवश्यक राहणार आहे. शेतकऱ्यांनी राष्ट्रीय पीक विमा पोर्टल (एनसीआयपी) वर ऑनलाइन अर्ज करावा किंवा बँक, कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) अथवा स्वतःच्या माध्यमातून अर्ज सादर करता येणार आहे.

याशिवाय डिजिटल क्रॉप सर्वे करून घेणे अनिवार्य करण्यात आले असून सर्वेक्षणातील पीक व विमा अर्जातील पिकामध्ये तफावत आढळल्यास डिजिटल क्रॉप सर्वे तील नोंद अंतिम ग्राह्य धरली जाईल. चुकीची अथवा खोटी माहिती देऊन अर्ज केल्यास संबंधित लाभार्थ्यावर नियमानुसार कारवाई होणार असून पुढील पाच वर्षे कृषी विभागाच्या विविध योजनांपासून वंचित राहावे लागू शकते, असा इशाराही कृषी विभागाने दिला आहे.योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित पिकाखाली किमान ०.१० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी संबंधित विमा कंपनी, सहाय्यक कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी,तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कोपरगाव किंवा १४४४७ हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तळागाळाशी संपर्क वाढवून शिवसेना मजबूत करा : आ. विलास भुमरे

### शेवगावातील संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट । पदाधिकारी-कार्यकर्त्यांशी संवाद, संघटन बळकटीवर भर

**● शेवगाव । वीरभूमी–**
आगामी काळातील पक्षाच्या विविध उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पदाधिकाऱ्याने जनतेच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात, गावपातळीवर नियमित संपर्क ठेवून शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन पैठण मतदारसंघाचे आमदार विलास भुमरे यांनी केले. तळागाळातील जनतेशी सातत्याने संपर्क ठेवून संघटना अधिक मजबूत करण्यावर त्यांनी भर दिला.

शेवगाव तालुकाप्रमुख तथा नगरसेवक आशुतोष डाहळे यांच्या संपर्क कार्यालयास आमदार भुमरे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी शेवगाव तालुक्यातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका कार्याध्यक्ष ताहेर पटेल, शिवसेना तालुकाप्रमुख तथा नगरसेवक आशुतोष डहाळे, युवा सेना जिल्हाप्रमुख साईनाथ आधाट, कैलास तिजोरे, राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नगरसेवक सुनील काकडे, जाकीर कुरेशी, अमर पुरनाळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष विक्रांत लांडे तसेच शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी आमदार भुमरे म्हणाले की, शिवसेना ही सर्वसामान्यांच्या विश्वासावर उभी राहिलेली संघटना आहे. विकासकामांना गती देत जनतेचा विश्वास अधिक दृढ करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करणे आवश्यक आहे. कार्यकर्त्यांच्या सूचना आणि स्थानिक प्रश्नांचा पाठपुरावा करून त्यांचे निराकरण करण्यासाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या तयारीचा आढावा घेण्यात आला.



■ छाया । अमोल कराळे

बूथस्तरावर संघटना मजबूत करणे, कार्यकर्त्यांशी समन्वय वाढविणे आणि जनसंपर्क अधिक प्रभावी करण्याबाबत चर्चा झाली.

कार्यक्रमाच्या शेवटी शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने आमदार विलास भुमरे यांचा सत्कार करण्यात आला.

# दमदार पावसाने अकोल्यातील भातशेतीला दिले जीवनदान; भातलावणीला वेग

**● अकोले । वीरभूमी –**
अकोले तालुका हा आदिवासीबहुल व पश्चिम घाटातील डोंगरदऱ्यांचा भाग असून, येथे मोठ्या प्रमाणावर भात शेती केली जाते. मुळा-प्रवरा खोऱ्यातील खिरविरे, राजूर, कोतूळ, भंडारदरा, धामणवन, शिरपुंजे तसेच अन्य आदिवासी भागात खरीप हंगामात भात लागवडीची मोठी लगबग सुरू असते. भात शेती हा येथील आदिवासी बांधवांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख आधार आहे.


यंदा पावसाळ्याला उशिरा सुरुवात झाल्याने शेतकरी चिंतेत होता. शेतात पुरेसे पाणी नसल्यामुळे अनेक ठिकाणी भाताची रोपे सुकू लागली होती. मात्र, भंडारदरा पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून दमदार पाऊस झाल्याने ओढे-नाले तुडुंब भरून वाहू लागले आहेत. शेतांमध्ये गुडघाभर पाणी साचल्याने शेतकरी पुरुष व महिलांनी चिखलात उतरून भातलावणीला वेग दिला आहे. भातलावणीच्या गाण्यांनी आणि शेतकऱ्यांच्या लगबगीने शेतशिवार पुन्हा गजबजून गेले आहे.

तालुक्यातील पाचनई, कुमशेत, घाटघर, रतनवाडी, साम्रद, बारी तसेच भंडारदरा धरण परिसरात सलग झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वी पावसाने दडी मारल्याने करपण्याच्या मार्गावर असलेल्या धानाच्या रोपांना नवसंजीवनी मिळाली असून शेतीच्या कामांना गती मिळाली आहे.

पावसाअभावी अनेक शेतकऱ्यांना भात रोपवाटिकांसाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागला होता. त्यामुळे उत्पादन खर्चात वाढ झाली होती. आता पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाल्याने सुकू लागलेल्या पिकांना जीवदान मिळाले असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आशेचे हास्य फुलले आहे. पावसाअभावी पुढे ढकललेली भात लागवडही आता वेगाने सुरू झाली आहे. मात्र, शेतीसाठी पुढील काळातही सलग आणि दमदार पावसाची गरज असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

### ढगफुटीमुळे भातशेतीचे नुकसान; पंचनाम्याची मागणी

■ भंडारदरा परिसरात दोन-तीन दिवसांपूर्वी झालेल्या ढगफुटीसदृश पावसामुळे अनेक ठिकाणी शेतीचे बांध फुटून भातशेतीचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तातडीने पंचनामे करून शासनाने योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी आदिवासी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



■ छाया । विद्याचंद्र सातपुते

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक- महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक- महादेव दळे, पत्ता- कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www.veerbhuminews.com

# गुन्हेगारांना कोणताही थारा नाही, गुन्हेगाराचे अतिक्रमित घर हटविणार

## डॉ. सुजय विखे पाटील यांचा इशारा । शिर्डी मंदिर परिसरासाठी नवे धोरण जाहीर होणार

**● शिर्डी । वीरभूमी –**

शिर्डीतील खून प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा-सुव्यवस्था अधिक कडक करण्यासाठी तसेच मंदिर परिसरातील अनधिकृत व्यवसाय आणि अतिक्रमणांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेण्यात येणार असल्याची घोषणा भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली. खून प्रकरणातील आरोपी राहत असलेल्या अतिक्रमित घराला नोटीस बजावण्यात आली असून, आठवडाभरात अतिक्रमण हटवले नाही तर नगरपंचायतीमार्फत जेसीबीच्या साहाय्याने ते हटविण्यात येईल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.



डॉ. विखे पाटील म्हणाले की, शिर्डीत घडलेली हत्या अत्यंत दुर्दैवी असून, गुन्हेगारांना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. कायद्यापुढे सर्व समान आहेत आणि नियमानुसार कारवाई प्रत्येकावर केली जाईल. संबंधित आरोपीला अतिक्रमणाबाबत नोटीस देण्यात आली असून, मुदतीत कारवाई न झाल्यास प्रशासन स्वतः अतिक्रमण हटविण्याची प्रक्रिया राबवेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मंदिर परिसरातील अनधिकृत विक्रीला आळा घालण्यासाठी स्वतंत्र हॉकर झोन विकसित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. साई मंदिराच्या चारही बाजूंच्या परिसरात कोणत्याही प्रकारची विक्री करण्यास परवानगी दिली जाणार नसून, पथविक्रेत्यांसाठी स्वतंत्र जागा निश्चित करण्यात येईल. कोण व्यवसाय करू शकतो, कोणत्या ठिकाणी व्यवसाय करता येईल आणि कोणत्या वस्तूंची विक्री करता येईल, याबाबतची सविस्तर नियमावली ग्रामस्थ, व्यापारी आणि संबंधित घटकांच्या सहभागातून तयार करण्यात येणार आहे.

मंदिर परिसरात भाविकांची फसवणूक करणारे, जादा दर आकारणारे किंवा अनधिकृत व्यवसाय करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असे सांगत डॉ. विखे पाटील म्हणाले की, अशा प्रकरणात केवळ विक्रेत्यावरच नव्हे, तर संबंधित दुकानमालक आणि जागामालकावरही गुन्हे दाखल करण्यात येतील. गरीब विक्रेत्यांवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही; त्यामागील मूळ सूत्रधारांवरही कायदेशीर कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

मंदिर परिसरातील फुले, प्रसाद, शाल आणि इतर पूजासाहित्याच्या विक्रीबाबत साई संस्थानने स्पष्ट धोरण जाहीर करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. संस्थानने कोणत्या वस्तूंना परवानगी असेल आणि कोणत्या वस्तू मंदिरात स्वीकारल्या जातील, याबाबत ठोस निर्णय घेतल्यास भाविकांची लूट आणि अनधिकृत विक्रीला मोठ्या प्रमाणात आळा बसेल, असे त्यांनी सांगितले.

पथविक्रेत्यांसाठीची अंतिम नियमावली येत्या आठवडाभरात ग्रामस्थांच्या बैठकीनंतर जाहीर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वारंवार व्यवसाय बंद-चालू करण्याऐवजी सर्वांना न्याय देणारा आणि कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर भर दिला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. विखे पाटील यांनी शिर्डी पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक करत, खून प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करण्यात पोलिसांना यश आल्याचे नमूद केले. शिर्डीत गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. भाविकांची सुरक्षितता, शहरातील शिस्त आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक ते सर्व कठोर निर्णय राबविले जातील, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## SPOT NEWS

### सिद्धार्थ वसतिगृहातील विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप

**● पारनेर । वीरभूमी–**

बहुजन शिक्षण संस्थेच्या सिद्धार्थ वसतिगृहातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वह्यांचे उत्साहात वाटप करण्यात आले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर गट)चे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक निकाळजे यांच्या वाढदिवसानिमित्त या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी युनिटी ऑफ मूलनिवासी समाज संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजेंद्र करंदीकर, सिद्धार्थ वसतिगृहाचे अधीक्षक संपत पवार, माजी सरपंच राजेंद्र साळवे, आरपीआय (आंबेडकर गट) तालुकाध्यक्ष किरण सोनवणे, ॲड. मोनिका सोनवणे, दादा शेटे आणि प्रतीक्षा मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे संच वितरित करण्यात आले. राजेंद्र करंदीकर म्हणाले, शिक्षण हेच प्रगतीचे प्रभावी साधन असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. आरपीआय आणि विविध सामाजिक संघटनांच्या माध्यमातून राबविण्यात येणारे असे उपक्रम समाज परिवर्तनासाठी प्रेरणादायी आहेत. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युवा अध्यक्ष अजय साळवे, निखिल गायकवाड, प्रदीप कसबे, अक्षय जाधव, मच्छिंद्र साळवे, संतोष साळवे, प्रताप साळवे, विशाल साळवे, यश साळवे, अभिजीत घाडगे, राजू उघडे, मानव खुपटे यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. वह्या मिळाल्याने गरजू विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. आवश्यक शालेय साहित्य वेळेवर उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यार्थ्यांनी व पालकांनी आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने करण्यात आली.

### फिरोदिया शिवाजियन्स फुटबॉल स्पर्धेत रंगला गोलांचा थरार

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

फिरोदिया शिवाजियन्स अकॅडमी आयोजित आठव्या आंतरशालेय फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी (दि. २८ जुलै) विविध वयोगटांतील अत्यंत चुरशीचे आणि रोमांचक सामने रंगले. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या सामन्यांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट, वेगवान आक्रमणे आणि प्रभावी बचावाचे दर्शन घडविले. काही सामने अखेरपर्यंत अटीतटीचे झाले, तर काही सामन्यांत विजेत्या संघांनी एकतर्फी वर्चस्व गाजवत दमदार विजयांची नोंद केली. १६ वर्षांखालील मुलींच्या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि आर्मी एमआयसी अँड एस यांच्यात रंगलेल्या सामन्यात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलने १-० अशा फरकाने विजय मिळवला. सामन्याच्या ३६व्या मिनिटाला पूर्वा मालवे हिने केलेला एकमेव गोल निर्णायक ठरला. श्री साईच्या बचावफळीने आर्मी संघाला एकही गोल करण्याची संधी न देता शानदार बचाव केला आणि विजयावर शिक्कामोर्तब केले. १६ वर्षांखालील मुलांच्या गटात श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल आणि आर्मी एमआयसी अँड एस यांच्यातील सामना अत्यंत चुरशीचा झाला. दोन्ही संघांनी वेगवान खेळ आणि आक्रमक रणनीती अवलंबली. मात्र, दोन्ही बाजूंच्या बचावफळीने भक्कम कामगिरी केल्याने कोणत्याही संघाला गोल करता आला नाही. परिणामी हा सामना ०-० गोलने बरोबरीत संपला. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात आर्मी एमआयसी अँड एसने श्री साई इंग्लिश मीडियम स्कूलवर २-० असा प्रभावी विजय मिळवला. आर्मी संघाकडून राजवीर याने २८व्या मिनिटाला गोल करून संघाचे खाते उघडले. त्यानंतर ३२व्या मिनिटाला जायन शेख याने आणखी एक गोल करत आघाडी दुप्पट केली. उत्कृष्ट बचाव आणि आक्रमक खेळाच्या जोरावर आर्मी संघाने सामना सहज आपल्या नावावर केला. याच गटातील पोदार इंटरनॅशनल स्कूल आणि ऊर्जा गुरुकुल यांच्यातील सामन्यात पोदार इंटरनॅशनल स्कूलने २-० असा विजय मिळवला. पोदारकडून विराज देशमुख याने १५व्या मिनिटाला पहिला गोल करत संघाला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर साई जाधव याने ४५व्या मिनिटाला दुसरा गोल करत विजय निश्चित केला. ऊर्जा गुरुकुलला मात्र संपूर्ण सामन्यात गोल करता आला नाही. दुपारच्या सत्रात १२ वर्षांखालील मुलांच्या गटात ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलने सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंटवर ३-० असा दणदणीत विजय मिळवला. ओएसिसचा आर्यन पंडित हा सामन्याचा नायक ठरला. त्याने ६व्या आणि ११व्या मिनिटाला सलग दोन गोल करत संघाला भक्कम आघाडी मिळवून दिली. त्यानंतर आदित्य सिंग याने ३८व्या मिनिटाला आणखी एक गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात मात्र सेक्रेडहार्ट कॉन्व्हेंटने पुनरागमन करत ओएसिस इंग्लिश मीडियम स्कूलवर २-० असा विजय मिळवला. सेक्रेडहार्टकडून स्तवन याने ३२व्या मिनिटाला तर आनंद शिंदे याने ३७व्या मिनिटाला गोल करत संघाला महत्त्वाचा विजय मिळवून दिला.

## संघर्ष, जिद्द आणि कार्यातून पंकजा मुंडेंनी निर्माण केला जनविश्वास : ॲड. प्रतीक खेडकर

**● पाथर्डी । वीरभूमी –**

संघर्षमय जीवन जगत प्रत्येक संकटाला सामोरे जात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी राज्याच्या राजकारणात स्वतःच्या नेतृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्याग, जिद्द आणि कार्याच्या बळावर त्यांनी सर्वसामान्यांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे, असे प्रतिपादन जगदंब प्रतिष्ठानचे संस्थापक ॲड. प्रतीक खेडकर यांनी केले.



पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुकुंद गर्जे मित्र मंडळातर्फे मतिमंद मुलांच्या बालगृहात वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन तसेच श्रीकृष्ण गोशाळेतील गाईंना चारा वाटप करण्यात आले. यावेळी ॲड. खेडकर बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अविनाश मंत्री होते. प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक अमोल गर्जे, बाळासाहेब गीते, महेश पठाडे, उद्योजक अक्षय काळे, गौरव शेटे, किरण पुरी, प्रशांत तुपे, महेश काटे, मंथन निराळी, यश गर्जे, शुभम इजारे यांच्यासह विद्यालयाचे कर्मचारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी विविध मान्यवरांनी पंकजा मुंडे यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा आढावा घेत त्यांच्या दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.


ॲड. खेडकर म्हणाले की, पाथर्डी तालुक्याचे मुंडे परिवाराशी घट्ट नाते आहे. राज्यातील कष्टकरी, पददलित, आदिवासी, गरीब, शेतकरी आणि ऊसतोड कामगार यांच्यासह सर्वसामान्य कार्यकर्ते पंकजा मुंडे यांच्याशी भावनिकदृष्ट्या जोडले गेले आहेत. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन शब्दांत करणे अशक्य आहे. त्या सर्वसामान्य जनतेचा आवाज बनल्या असून प्रत्येकाला त्यांचा भावनिक आधार वाटतो.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवान पायमोडे यांनी केले. सूत्रसंचालन गौरव खताळ यांनी, तर आभार शुभम तुपे यांनी मानले.

## श्रीगोंदा नगरपरिषदेच्या कारभाराविरोधात संभाजी ब्रिगेडचे ३ ऑगस्टपासून लक्षवेधी आंदोलन

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

शहरातील प्रलंबित विकासकामे, नागरी सुविधांतील त्रुटी आणि नगरपरिषदेच्या कथित निष्क्रिय व अपारदर्शक कारभाराच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेड, श्रीगोंदा तालुक्याच्या वतीने सोमवार, दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून नगरपरिषद कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष शाम राम जरे यांनी दिली.



संभाजी ब्रिगेडने नगरपरिषदेला दिलेल्या निवेदनात शहरातील विविध विकासकामे रखडल्याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. संभाजी महाराज चौकाच्या सुशोभीकरणासाठी निधी मंजूर होऊनही अनेक वर्षांपासून काम पूर्ण झाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ऑनलाइन निविदा प्रक्रियेत पात्र ठेकेदार व संस्थांना अपात्र ठरवून स्पर्धा कमी केली जात असल्याने शासकीय नियमांचे उल्लंघन होऊन सार्वजनिक निधीचा अपव्यय होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याशिवाय, १९ जून २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या नमो उद्यान कामाच्या निविदेचा निर्णय अद्याप जाहीर न झाल्याबद्दल प्रश्न उपस्थित करण्यात आला असून, संबंधित कारणे स्पष्ट करून निविदा प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने तातडीने पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली आहे. मुदत संपल्यानंतरही काही वार्षिक निविदा सुरू ठेवल्याचा आरोप करत त्याची स्वतंत्र चौकशी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

शहरातील मोकाट जनावरांचा वाढता उपद्रव, बायपास परिसरातील कचरा व अस्वच्छता, अतिक्रमणे, अव्यवस्थित पार्किंग, उघडी गटारे आणि त्यातून निर्माण होणारे आरोग्यविषयक धोके यांसारख्या नागरी समस्यांवर वारंवार निवेदने व आंदोलने करूनही प्रशासनाने प्रभावी उपाययोजना केल्या नसल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे.

संभाजी ब्रिगेडने नगरपरिषद प्रशासनाला ३ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत सर्व विषयांवर ठोस कार्यवाही करून त्याची लेखी माहिती देण्याची मागणी केली आहे. अन्यथा त्याच दिवसापासून नगरपरिषद कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

उपाध्यक्ष दिलीप लबडे यांनी सांगितले की, केवळ आश्वासने किंवा बैठकीतील चर्चा स्वीकारली जाणार नाही. प्रत्यक्ष कार्यवाही झाल्यानंतरच आंदोलन मागे घेण्याबाबत विचार करण्यात येईल.

## पाथर्डी आगारात दाखल पाच नव्या अत्याधुनिक 'जिजाऊ'एसटी बसेसचे उत्साहात पुजन

### अक्कलकोट व पंढरपूरसाठी कायमस्वरूपी बससेवा; नगर मार्गावरही वाढीव फेऱ्यांचे नियोजन

**● पाथर्डी । वीरभूमी–**

आमदार मोनिका राजळे व आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या पाठपुराव्यामुळे पाथर्डी एसटी आगाराला अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा पाच नव्या बसेस प्राप्त झाल्या आहेत. या नव्या बसेसमुळे प्रवाशांच्या दीर्घकालीन मागणीनुसार अक्कलकोट व पंढरपूरसाठी कायमस्वरूपी बससेवा सुरू करण्यात येणार असून नगर मार्गावरील वाढती प्रवासी गर्दी लक्षात घेऊन अतिरिक्त फेऱ्यांचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती आगारप्रमुख अमित बनसोडे यांनी दिली.



राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक आगाराला पाच नवीन बसेस देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार पाथर्डी आगाराला पाच बसेस मिळाल्या असून उर्वरित बसेसही लवकरच उपलब्ध होतील, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी बोलताना आगारप्रमुख अमित बनसोडे म्हणाले, सुमारे दोन वर्षांपूर्वी आगाराला दहा बसेस मिळाल्या होत्या. आता आणखी पाच बसेस दाखल झाल्याने सेवा विस्ताराला चालना मिळणार आहे. लांब पल्ल्याच्या मार्गांसाठी आणखी किमान दहा बसेसची आवश्यकता असून पुढील वर्षी होणाऱ्या नाशिक कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन नियोजन करण्यात येत आहे. नगर मार्गावरील बससेवेबाबतही प्रवाशांच्या तक्रारी कमी करण्यासाठी उपलब्ध बसेसचा प्रभावी वापर केला जाईल.

लोकार्पण सोहळ्यात नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी दोन्ही आमदारांचे आभार मानत बसस्थानकांचे सुशोभीकरण, काँक्रिटीकरण व स्वच्छतागृहाच्या कामांसाठीही सहकार्य करण्याची अपेक्षा व्यक्त केली. पालिकेकडून आवश्यक ना हरकत प्रमाणपत्रासंदर्भातील अडथळे दूर झाल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ॲड. अंकुश गर्जे यांनी जुने बसस्थानक 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' (बीओटी) तत्त्वावर विकसित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यास लवकरच मंजुरी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच पाथर्डी आगारासाठी आणखी बसेस मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, वाहतूक निरीक्षक गोवर्धन दहिफळे, कामगार संघटनेचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कर्मचारी व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुकुंद गर्जे यांनी, तर आभार बाळासाहेब सोनटक्के यांनी मानले.

### भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक

■ जुन्या बसस्थानकाच्या 'बांधा-वापरा-हस्तांतरित करा' (बीओटी) योजनेच्या अंमलबजावणीवरून भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक झाली. स्वच्छतागृहाच्या जागेचा व बसस्थानक परिसरातील विकासकामांचा मुद्दा चर्चेचा केंद्रबिंदू ठरला. एसटी महामंडळाच्या जागेची मोजणी करून कंपाऊंड उभारल्यानंतरच पुढील विकासकामांना सुरुवात होणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# पोनि. ठेंगे साहेब!. ... यांची दुकानदारी चालुद्या की राव

## श्रीगोंद्यात समाजसेवेच्या नावाखाली ब्लॅकमेलिंगच्या किळसवाण्या कहाण्यांना लागला लगाम । शिस्तप्रिय कारभारामुळे श्रीगोंदा पोलिस ठाण्याला नवी दिशा

**■ विजय उंडे**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी जुने फरार आरोपी, प्रलंबित गुन्हे यांचा गेल्या दोन महिन्यात निपटारा केला आहे. महाविद्यालयांच्या भोवती धुडगूस घालणाऱ्यांना चाप बसवला आहे. तालुक्यात विना नंबर प्लेटची गाडी फिरवणे गुन्हेगारांनासह सर्वांना अवघड होऊन बसले आहे. अनेक वर्षानंतर चांगला शिस्तप्रिय अधिकारी श्रीगोंद्याल लाभला आहे. पोलिस ठाण्याभोवतालची अनेकांची सामाजिक दुकानदारी बंद पडल्याने ते श्री. ठेंगे यांच्या नामाचा जयघोष करीत आहेत

दोन महिन्यापूर्वी पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी श्रीगोंदा पोलिस ठाण्याचा पदभार स्वीकारला. तालुक्यात चोरीच्या मोटारसायकलींचा सुळसुळाट होता. विना नंबर प्लेट घेऊन मोटारसायकल स्वार श्रीगोंदा शहरासह तालुकाभर बेमालुमपणे फिरत होते. या मोटारसायकल स्वारांवर कारवाईचा बडगा श्री. ठेंगे यांनी उचलला. शासनाला एक कोटीच्या जवळपास महसूल मिळवून दिला. पोलिसांना वाँटेड असलेले, कित्येक वर्षांपासून फरार असलेले, वेषांतर केलेले, नाव बदलून ठिकठिकाणी राहत असलेले आरोपी गजाआड केले. पोलिस ठाण्यामध्ये चोरीच्या मोटारसायकली, चोरीची वाहने यांचे ढिगच्या- ढीग साचले होते. पोलिस ठाणे परिसर किळसवाणा दिसत होता. त्या सर्वांची विल्हेवाट लावत परिसर पूर्ण स्वच्छ केला.

श्रीगोंदा पोलिस ठाण्यामध्ये अनेक स्वयंघोषित नेते, स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्ते, स्वयंघोषित विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते, फिर्यादीबरोबर कुणीतरी सामाजिक कार्यकर्ता यायचाच.. आपल्या खोट्या पदाच्या दबावापोटी खोटा गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न करायचा. परत आरोपी बरोबरही असाच संघटनेचा कार्यकर्ता यायचा, तडजोडीत मालामाल होऊन ढेकर देऊन संध्याकाळी घरी जायचा. मात्र पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांनी पोलिस ठाण्यात येणाऱ्या जाणाऱ्यांची आवक - जावक नोंदी ठेवल्याने या स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्यांचा बाजार उठला. दररोज चाललेली रोजीरोटी बंद पडल्याने या तथाकथित सामाजिक कार्यकर्त्यांचा ठणाणा सुरू झाला आहे.



या तथाकथित सामाजिक कार्यकर्त्यांनी जनतेसमोर अधिकाऱ्यांना एकेरी बोलायची, आवाज वाढवून बोलायची, वेळप्रसंगी जनतेसमोर त्यांच्या खुर्चीवर बसण्यापर्यंत या तथाकथित सामाजिक कार्यकर्त्यांची मजल गेली होती. त्यांच्या पदाचा व शिक्षणाचा कोणताही मुलाहिजा ठेवला जात नव्हता या तथाकथित व स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्यांचे स्वतःचे शिक्षण किती हा विषय निश्चितच संशोधनाचा होईल.

या स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्यांच्या ब्लॅक मेलिंगच्या अनेक कहाण्या लोक रसभरीतपणे सांगतात. गेल्यावर्षी एका सामाजिक कार्यकर्त्याने एका साखर कारखानदाराकडून दुसऱ्या साखर कारखान्याची बदनामी करण्यासाठी पाच पेट्या घेतल्या. काही काळ त्या साखर कारखान्याची बदनामी करण्यात आली. मात्र त्या साखर कारखानदाराच्या लक्षात आले. शेवटी त्याने आपली बदनामी थांबवण्यासाठी त्या स्वयंघोषित कार्यकर्त्याला दहा पेट्या देऊन गप्प केले. येथून बदलून गेलेल्या एका तहसीलदाराला तालुक्यातील दोघा स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्यांने १५ लाखांना टाकले. त्यातील एक स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्याने नगरमध्ये आणून दुसऱ्या कार्यकर्त्याला चक्क चाळीस ड्रेस घेतले. त्या कार्यकर्त्यांचे चाळीस ड्रेसवरच भागवून बाकी सगळी शिकार त्या एकट्यानेच खाल्ली अशा अनेक कहाण्या या सामाजिक कार्यकर्त्यांच्या आहेत. यांची घरची स्थावर मालमत्ता किती, यांची उत्पन्नाची साधने किती, या तोकड्या असताना यांच्याकडे आलिशान गाड्या व स्टार्चचे कपडे येतात कुठून हा संशोधनाचा विषय आहे.

### शाब्बास ठेंगे साहेब मागे हटू नका..!!

■ सामाजिकतेच्या नावाखाली तालुक्यात चाललेले उघडपणे ब्लॅकमेलिंग अधिकाऱ्यांवर दबाव आणून आपल्याला हवे तसे कामे करून घेणे याबाबत श्रीगोंदा तालुक्यातील काही स्वयंघोषित सामाजिक कार्यकर्त्यांची चढाओढ सुरू होती. आपण आल्यानंतर आपण हा दबाव झुगारून देऊन अनेकांना त्यांच्या औकातीची जागा दाखवली आहे. समाजमन आपल्याबरोबर आहे व आपल्याला साथ देत राहील..

# श्री रेणुकामाता मल्टीस्टेटच्या शेवगाव शाखेचे भव्य नव्या वास्तूत स्थलांतर

## वर्धापनदिनी वातानुकूलित पाच मजली स्वमालकीच्या इमारतीचे उद्घाटन । पारदर्शक व्यवहारामुळे देशभरात संस्थेचा विस्तार : महंत आदिनाथ महाराज शास्त्री

**● शेवगाव । वीरभूमी –**
श्री रेणुकामाता मल्टीस्टेटच्या पारदर्शक व विश्वासार्ह व्यवहारामुळे संस्था आज देशातील नऊ राज्यांत १४१ शाखांपर्यंत विस्तारली आहे. सभासदांना अधिक दर्जेदार सेवा-सुविधा देण्यासाठी स्वमालकीच्या वास्तू उभारण्यावर ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांनी भर दिल्याने शेवगाव शाखेचे वर्धापनदिनाचे औचित्य साधून वातानुकूलित पाच मजली भव्य स्वमालकीच्या इमारतीत स्थलांतर करण्यात आले. या नव्या वास्तूचे उद्घाटन तारकेश्वर गडाचे महंत शांतिब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री यांच्या हस्ते उत्साहात झाले.

यावेळी बोलताना महंत आदिनाथ महाराज शास्त्री म्हणाले, श्री रेणुकामातेच्या आशीर्वादाने आणि पारदर्शक व्यवहारामुळे संस्थेने देशभरातील ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. त्यामुळे संस्थेने अल्पावधीत उल्लेखनीय आर्थिक प्रगती साधत देशभरात आपले जाळे विस्तारले आहे. या यशामागे डॉ. प्रशांत (नाना) भालेराव यांचे दूरदृष्टीचे नेतृत्व आणि अथक परिश्रम आहेत, असे त्यांनी सांगितले.

उद्घाटनापूर्वी संस्थेचे ज्येष्ठ संचालक विष्णुपंत भालेराव यांनी सपत्नीक श्री रेणुकामाता पूजन, वास्तुशांती व नवचंडी यागात सहभाग घेतला. यावेळी मंगलताई





भालेराव, जयंती भालेराव, मनीषा भालेराव, प्रज्ञेश भालेराव, गौरी भालेराव, रुद्रांश भालेराव व देवांश भालेराव उपस्थित होते. पौरोहित्य सार्थक देवा यांनी केले.

या कार्यक्रमास हनुमान टाकळीचे महंत रमेश अप्पा महाराज, आमदार मोनिकाताई राजळे, पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, ज्येष्ठ नेते अरुण लांडे, ज्ञानेश्वर कारखान्याचे व्हा. चेअरमन काकासाहेब नरवडे, संचालक बबनराव भुसारी, अंबादास कळमकर, उद्योजक फुलचंद रोकडे, शिवसेनेचे अरुण मुंढे, डॉ. मेधा कांबळे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस नंदकुमार मुंढे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष दत्तात्रय फुंदे, उद्योजक युसुफ पठाण, रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. पुरुषोत्तम बिहाणी, उपाध्यक्ष प्रा. डॉ. गजानन लोंढे, डॉ. संजय लड्डा, डॉ. गणेश चेके, शिवा शेळके, बंडू रासने, नगरसेवक कमलेश गांधी, एजाज काझी, ॲड. रघुनाथ राठी, हरिश्चंद्र मोरे, पांडुरंग देवकर, गणेश गाढे, राहुल जोशी, कार्तिक मुनगुंटीवार, सेवानिवृत्त ऑडिटर सुधाकर जाखडे, श्री. ठोंबरे, विजय पोटफोडे, बाळासाहेब चौधरी, एकनाथ कुसळकर, सुरभी हॉस्पिटलचे अध्यक्ष अनिरुद्ध देवचक्के, सचिव ॲड. गणेश शेंडगे, ज्येष्ठ पत्रकार हनुमंत पाटील, नरेंद्र अंकुश, रवींद्र जरे तसेच पत्रकार सचिन सातपुते, वीरभूमीचे संपादक महादेव दळे, संदीप देहाडराय, रावसाहेब मरकड, रामनाथ रुईकर, दादा डोंगरे, अविनाश देशमुख, अलीम शेख, आयाज शेख, विजय धनवडे, संस्थेचे तंत्रज्ञ दिनेश टकले, पोपट काळे, सच्चिदानंद देवा देशपांडे, तुषार देवा तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी, उद्योजक, संस्थांचे प्रतिनिधी, असंख्य खातेदार व ठेवीदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. प्रशांत भालेराव यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. तर संस्थेच्या वतीने ॲड. नितीन भालेराव, शेवगाव शाखा व्यवस्थापक राजेंद्र नांगरे, पाथर्डी शाखा व्यवस्थापक अश्वलिंग जगनाडे, राहुरीचे शाखा व्यवस्थापक श्री. आढाव, श्रीमंत घुले, प्रा. जनार्दन लांडे पाटील आणि डॉ. अरविंद पोटफोडे यांनी मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शाखा व्यवस्थापिका मिना गाढे व त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

# भूमिपुत्रांना कायमस्वरूपी रोजगारासाठी तीव्र आंदोलन

## एस.पी.एम.एल. कंपनीविरोधात पळवे खुर्दच्या युवकांचे उपोषण सुरू

**● पारनेर । वीरभूमी –**
पारनेर तालुक्यातील पळवे खुर्द हद्दीतील एस.पी.एम.एल. प्रा. लि. कंपनीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांना कायमस्वरूपी रोजगारात प्रथम प्राधान्य द्यावे, या मागणीसाठी गावातील युवकांनी सोमवार (दि. २७) पासून उपोषण सुरू केले आहे. मात्र प्रशासन व कंपनी व्यवस्थापनाने अद्याप कोणतीही दखल न घेतल्याने ३० जुलैपासून आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा युवकांनी जिल्हाधिकारी व कंपनी व्यवस्थापनाला निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, स्थानिक भूमिपुत्रांना कायमस्वरूपी रोजगार देण्याची मागणी यापूर्वीही अनेकदा करण्यात आली होती. मात्र कंपनीकडून जाणीवपूर्वक स्थानिक युवकांना डावलले जात



आहे. कंपनी गावापासून अवघ्या ४०० मीटर अंतरावर असूनही गावातील युवकांना कोणत्याही प्रकारचा रोजगार देण्यात आलेला नाही.

गावकऱ्यांच्या जमिनीचे भूसंपादन झाल्याने अनेक कुटुंबे भूमिहीन झाली आहेत. त्यातच तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे उपजीविकेसाठी स्थानिक युवकांना कंपनीत काम देण्याची मागणी करण्यात आली आहे.

सन २०१८ मध्ये पळवे खुर्द येथे झालेल्या बैठकीत तत्कालीन जिल्हाधिकारी, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, प्रांताधिकारी, तहसीलदार आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत कंपनीच्या कामांमध्ये नियमाप्रमाणे स्थानिकांना प्राधान्य देण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. मात्र आजतागायत त्या आश्वासनाची अंमलबजावणी झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

स्थानिक शेतकरी व कष्टकरी कुटुंबातील युवकांना रोजगार न मिळाल्यामुळे त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला असून, ३० जुलैपर्यंत मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

या उपोषणात सचिन इरकर, रामदास इरकर, गणेश बारगळ, रंगनाथ बारगळ, अमोल तरटे, अविनाश गाडीलकर, अक्षय इरकर यांच्यासह मोठ्या संख्येने युवक सहभागी झाले आहेत.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**४,९६८ नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ**

**● श्रीगोंदा । वीरभूमी –**
महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान अंतर्गत श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघात आयोजित शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरामध्ये तब्बल ४,९६८ लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ देण्यात आला.

कोळगाव फाटा येथील कांडेकर लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या या



शिबिरात महसूल, सार्वजनिक वितरण व्यवस्था (पुरवठा), वन, नगरपरिषद, पंचायत समिती, शिक्षण, महिला व बाल विकास, कृषी, आरोग्य, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जात प्रमाणपत्र विभाग आदी विविध शासकीय विभागांनी सहभाग घेत नागरिकांना विविध योजनांची माहिती दिली. तसेच अनेक अर्ज व प्रकरणांचा तत्काळ निपटारा करून नागरिकांची कामे मार्गी लावली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे उपविभागीय अधिकारी श्रीकुमार चिंचकर यांनी शासनाच्या कल्याणकारी योजना प्रभावीपणे सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विक्रमसिंह पाचपुते होते. त्यांनी शासनाच्या विविध योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी अशा अभियानांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करून छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तहसीलदार सचिन डोंगरे यांनी प्रास्ताविकातून अभियानामागील उद्दिष्टे स्पष्ट करत नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या संकल्पनेची माहिती दिली.

कार्यक्रमाच्या शेवटी मंडळ अधिकारी श्रीमती शैला पाडळकर यांनी उपस्थित मान्यवर, अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांचे आभार मानले.

# देवनाथ फाऊंडेशनकडून पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**● पाथर्डी । वीरभूमी–**
लोकनेत्या तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त देवनाथ फाऊंडेशनच्या वतीने जि.प. प्राथमिक शाळा, मालेवाडी येथे ऊसतोडणी मजूर व वाहतूक कामगारांच्या पाल्यांना शालेय साहित्य व मिठाईचे वाटप करण्यात आले.

सामाजिक दायित्वाच्या भावनेतून वंचित घटकांसाठी उपयुक्त उपक्रम राबवित ज्येष्ठ नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त हा सेवाभावी कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे फाऊंडेशनचे प्रमुख तथा संयोजक डॉ. ज्ञानेश्वर दराडे यांनी सांगितले.

यावेळी विश्व हिंदू परिषद प्रखंड मंत्री गणेश जवरे, उपसरपंच



तुकाराम खेडकर, कपिल बांगर, मयुर काळुसे, अविनाश जवरे, अनिल जवरे, महेश आव्हाड, पंढरीनाथ खेडकर, सोनू गिते, पांडुरंग जगताप आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कमलाकर साडेगावकर यांनी केले. स्वागत सौ. पुष्पा फुंदे व शंकर राजगुरू यांनी केले. जि.प. शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप आंधळे यांनी मालेवाडी ग्रामस्थांनी शालेय शिक्षणासाठी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल गौरवोद्गार काढत सर्वांचे आभार मानले.

# महिला सक्षमीकरणासाठी जिजाऊ ब्रिगेडचे कार्य प्रेरणादायी

## रोहिणी नलवडे । पाथर्डीतील महिला मेळाव्यात स्वावलंबन, नेतृत्व आणि आर्थिक आत्मनिर्भरतेवर भर

**● पाथर्डी । वीरभूमी –**
महिलांना आत्मसन्मान, सुरक्षितता आणि आर्थिक, सामाजिक तसेच वैचारिक सक्षमीकरण मिळवून देण्यासाठी जिजाऊ ब्रिगेड सातत्याने कार्यरत आहे. 'लखपती जिजाऊ' व 'शंभूराजे युवा ठेव' यांसारख्या योजनांद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर बनविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संघटना करत असल्याचे प्रतिपादन जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा मार्गदर्शक रोहिणी नलवडे यांनी केले.

पाथर्डी तालुका जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने आयोजित महिला मेळाव्यात त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. उद्योजिका अर्चना धाकतोडे या प्रमुख पाहुण्या म्हणून



उपस्थित होत्या.

यावेळी तालुकाध्यक्ष सुवर्णा कोकाटे, कार्याध्यक्ष रंजना सावंत, सहसचिव रोहिणी दारकुंडे, आशाताई देवढे, अर्चना शेळके, अमृता गवळी, वर्षा वाघ, वर्षा सातपुते, तारामती घालमे, जयश्री कोलते, सोनाली गरड, योगिता शिंदे, सुनिता बोरुडे, कैलासराव देवढे, महेश नलवडे तसेच जिजाऊ प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र सावंत उपस्थित होते.

मार्गदर्शन करताना रोहिणी नलवडे म्हणाल्या की, राष्ट्रमाता जिजाऊंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी जिजाऊ ब्रिगेड प्रभावीपणे कार्यरत आहे. महिलांना नेतृत्वाची संधी, समाजात सन्मानाचे स्थान, सुरक्षित वातावरण, संस्कृतीचे जतन आणि वैचारिक प्रगल्भता मिळावी यासाठी संघटना विविध उपक्रम राबवत आहे. पाथर्डी तालुक्यातील कार्य उल्लेखनीय असून, संघटनेची ताकद वाढविण्यासाठी महिलांनी अधिक जोमाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी महिलांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता अधोरेखित केली. आदर्श समाजनिर्मितीसाठी राष्ट्रमाता जिजाऊंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे कार्य जिजाऊंच्या लेकी करत असल्याचा अभिमानही व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महेश नलवडे, अर्चना धाकतोडे, रंजना सावंत, रोहिणी दारकुंडे, सुवर्णा कोकाटे आणि राजेंद्र सावंत यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार वर्षा सुधाकर सातपुते यांनी मानले.

# समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये भक्तिरसात रंगली भव्य कीर्तन स्पर्धा

## आषाढी एकादशीचे औचित्य साधत संतविचारांचा जागर । झेनिथ हाऊस विजेते, विद्यार्थ्यांच्या ओजस्वी सादरीकरणाला दाद



**● कोपरगाव । वीरभूमी –**
आषाढी एकादशीचे औचित्य साधत संतपरंपरेचा वारसा, भारतीय संस्कृतीची मूल्ये आणि भक्तीचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने समता इंटरनॅशनल स्कूलमध्ये भव्य कीर्तन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी अभंग, भारूड, संतवाङ्मय आणि समाजप्रबोधनपर विषयांवर आधारित कीर्तन सादर करून उपस्थितांची वाहवा मिळविली.

कॉसमॉस, ओसिस, प्लॅटिनम आणि झेनिथ या चारही हाऊसच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी निरूपण, अभ्यासपूर्ण मांडणी आणि ओजस्वी वाणीच्या माध्यमातून संतविचारांचा जागर घडविला.

कार्यक्रमाला सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. मोनिकाताई येवले आणि ह.भ.प. मयूर महाराज येवले हे प्रमुख पाहुणे व परीक्षक म्हणून उपस्थित होते. तसेच सुहासिनीताई कोयटे (काकीजी), कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे, प्राचार्य समीर अत्तार आणि उपप्राचार्या मोहिनी जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना ह.भ.प. मोनिकाताई येवले यांनी कीर्तन ही केवळ कला नसून संस्कार, अध्यात्म आणि समाजप्रबोधनाची प्रभावी परंपरा असल्याचे सांगितले. संतांचे विचार जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन करत त्यांनी विद्यार्थ्यांना सत्य, सेवा, सदाचार आणि भक्तीचा मार्ग स्वीकारण्याची प्रेरणा दिली.

स्पर्धेचा निकाल जाहीर झाल्यानंतर ह.भ.प. मयूर महाराज येवले यांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण आणि भावपूर्ण सादरीकरणाचे कौतुक केले. संतसाहित्य आणि भारतीय संस्कृतीचा वारसा जपण्याची जबाबदारी नव्या पिढीची असून, भविष्यात संतविचारांचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचविणारा इंग्रजी भाषिक कीर्तनकार समता इंटरनॅशनल स्कूलमधून घडावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे यांनी शिक्षणासोबत संस्कार, संस्कृती आणि अध्यात्माची जोड देणारे उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असल्याचे सांगितले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, वक्तृत्वकौशल्य, सामाजिक जाणीव आणि भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण होतो, असे त्यांनी नमूद केले.

स्पर्धेच्या यशामागे जयश्री श्रीवास्तव, शिल्पा इंगळे, सुजाता वाणी आणि नंदिनी वक्ते यांनी हाऊस मास्टर म्हणून केलेले मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. चुरशीच्या स्पर्धेत झेनिथ हाऊसने आशयपूर्ण मांडणी, प्रभावी निरूपण आणि कल्पक सादरीकरणाच्या जोरावर विजेतेपद पटकावले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या संघाला चॅम्पियन ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सजावटीची जबाबदारी कला शिक्षक विभावरी नगरकर, मंगेश गायकवाड आणि गोरख बोरसे यांनी प्रभावीपणे सांभाळली. किरण लद्दे आणि आकाश मिश्रा यांनी कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय केला. सूत्रसंचालन निधी जगताप, गौरव काकडे आणि नंदिनी वक्ते यांनी केले, तर आभारप्रदर्शन शिल्पा इंगळे यांनी केले.

संतविचारांचा जागर, संस्कारांची जोपासना आणि भारतीय संस्कृतीचे जतन करणारी ही कीर्तन स्पर्धा समता इंटरनॅशनल स्कूलच्या मूल्याधिष्ठित शिक्षणपरंपरेतील आणखी एक प्रेरणादायी उपक्रम ठरली.